//श्रीराम //

[ प.पू. दत्तमहाराजांनी दासबोध दशक ३ समास १० वर सांगितलेले चिंतन. हे चिंतन मननीय असल्यामुळे त्यांच्या अनुमतीने प्रसाद म्हणून त्यांच्या ८५व्या वर्धापनदिनानिमित्त देत आहोत. ]

माघ व. षष्ठी
३/३/९४ [गुरु.]

वैराग्य निरुपण

द. ३ स. १०
दासबोध

या भूतलावर सर्व प्राणीमात्रांचा मृत्यु हा कमी जास्त कालाने निश्चित ठरलेला आहे. तथापि, जरी काहींनी जीवन शाश्वत मानल आणि तसें वागले तरीही त्यांना इथे मृत्यु हा ठरलेलाच आहे. म्हणून भाग्याने लाभलेल्या या देहाचे सार्थक हे आत्मज्ञान प्राप्तीने प्रत्येकाने करुन घ्यावे.

आत्मज्ञान झाल्याशिवाय मृत्यु टळत नाही. जोपर्यंत देहात्मवाद संपत नाही तोपर्यंत ते शक्य नाही. हा देह म्हणजे मी आहे असे समजल्याने मृत्यु आहे आणि देहापासून मी वेगळा आहे हे समजल्यावर मला जन्मही नाही आणि मृत्यूही नाही. मी नित्य आहे. जे जाते ते शरीर आहे.

पण हे ऐकल तरी कळत नाही. नाम आणि रुप हे देहाचे आहे आणि ते जगात आल्याबरोबर येतेच. मी वेगळा आहे हे कळलं तरी त्यात तो पडतोच. अन्नमय वगैरे कोषात तो अडकतो. मी शरीरापेक्षा वेगळा आहे हे पक्क झाल पाहिजे. मी शरीर आहे हे जेवढ पक्क झालं आहे तेवढच मी आत्मा आहे हे पक्क झालं पाहिजे.

हळूहळू हे होणारं आहे. संतांनी यासाठी ईश्वराची भक्ती सांगून ठेवली आहे. ती कायम ठेवली पाहिजे. सतत ईश्वराची प्रार्थना करत राहायचं, तसं केले म्हणजे तसे अधिकारी महात्मे त्याला भेटतात आणि ते त्याला बाजूला काढतात. पण तसे महात्मे भेटल्यावरसुध्दा प्रयत्न पाहीजे. सत्संगती मिळाली तरी पूर्वीच पाप असते तशी बुध्दी होते. मनामध्ये ज्या दुर्वासना असतात त्यामुळे चांगला सहवास मिळूनही उपयोग होत नाही. दुर्योधनाचं उदाहरण नाही का ! अनेक संत त्याच्याकडे येत होते. दुर्वास स्वतः त्याच्याकडे राहयले. यानेही चार महिने त्यांची उत्तम सेवा केली. पण मनात काय तर पांडवांचा द्वेष. त्यांना प्रसन्न करुन त्यांच्याकडून पांडवांचा नाश करायचा. हेच मागितलं ना त्यांनी.

कृ.मा.प.

सगळ फुकट गेल. याला काय, "या संसारातून मला सोडवा"असं म्हटल्यावर सोडवल नसतं का त्यांनी. केवढी शक्ति आहे त्यांची. पण नाही, याला तशी बुध्दीच झाली नाही. म्हणून प्रयत्न हवा. "यत्न तो देव जाणावा" असं म्हणतात. यत्नाने सर्व काही होते. जन्मापासून वैराग्य असणारे फार थोडे असतात. देह तादात्म्य असे पर्यंत हे सुखदुःख आहे.

अर्जुनासारखा मोठा भक्त, पण तोही म्हणाला, मन आवरता येत नाही. प्रथम कृष्णही अवघड आहे म्हणाले पण सतत प्रयत्नाने आणि अभ्यासाने ते आवरता येण शक्य आहे. घडणा-या सर्व गोष्टींचा मी साक्षी आहे. माझा याचा काही संबंध नाही. हा साक्षीभाव सतत हवा. हाच वेदान्त आहे.

कठोपनिषदात त्या नाचिकेताची गोष्ट आहे ना. यमाकडे गेला. तीन दिवस, तीन रात्र दाराशी बसून होता. शेवटी यम आला. काय पाहीजे म्हणाला. हा म्हणाला हा जीवात्मा कुठं जातो ? या प्रश्नाच उत्तर मला द्या. कोणी नाही म्हणतात. कोणी हो म्हणतात. तुम्ही मला समजवून सांगा. त्याचं वैराग्य तपासण्यासाठी यमाने सर्व प्रलोभन दिली. राज्य, संपत्ती, स्त्रिया, पण , मला काही नको म्हणाला. मला फक्त या प्रश्नाचं उत्तरं हवयं. सर्वच नको ही इच्छा म्हणजे"वैराग्य" आहे. नंतर यमाचा उपदेश झाला.

अहं –देह, इंद्रिय, मन यापासून वेगळा जो जीवात्मा तो मी आहे हा विचार अखंड झाला पाहीजे. स्वरुपानुसंधान हे सतत घडलं पाहीजे. आणि त्यासाठी टेंबे स्वामी महाराजांनी त्या स्तोत्रादीसंग्रहात लिहून ठेवलय

स्वरुपानुसंधान, व्हाया किजे मनश्शोधन
देवगुरुसेवन, सदाचरण अनासक्ते ॥

सतत स्वरुपानुसंधान घडण्याकरता मन स्थिर, शुध्द झालं पाहिजे. आणि ते होण्यासाठी देवाची, गुरुंची सेवा करायची आहे. शास्त्रावर, गुरुवाक्यावर श्रध्दा पाहीजे. नुसत्या श्रध्देने ईश्वराचे नामस्मरण केले तरी चालते. ईश्वराची शक्ती मोठी आहे ही पक्की श्रध्दा पाहीजे.

पापं तापं व्याधीमाधींच दैन्यं,
भितीं क्लेशं त्वंहरआशु, त्वदन्यं
त्रातारं नो वीक्ष्ईशास्तजुर्ते
घोरत्कष्टादुध्दरास्मान्नमस्ते ।।

सर्व शक्तिमान असा ईश्वर आहे. सर्वांची दुःख घालविणाराही तोच आहे, हे पक्क झालं पाहिजे. यासाठी संतांनी भक्तिमार्ग सांगितला आहे. भक्तांची, देवाची चरित्र वाचावीत. ही चरित्र वाचून त्याचे चिंतन केले म्हणजे मनाची स्थिरता होते. ईश्वराच्या चरित्राच्या चिंतनाने अहं कोण आहे त्याच्याजवळ जाता येते. विवेक, वैराग्य, इंद्रियदमन इत्यादी झाल्यावरच मनुष्य वेदांत श्रवणाचा अधिकारी होतो.

ते होण्यासाठी सतत प्रयत्न सुरु ठेवायचा. देहाची, मनाची सर्व प्रेरणा परमेश्वराची आहे. आपल्या इंद्रियांशी फक्त आपला संबंध असतो. पण सर्वेही मनाशी संबंध ठेवणारी अशी ईश्वरशक्ती आहे. म्हणून त्याला शरण जायचं. प्रयत्नामध्ये जर अडथळे येत असतील तर ते दूर करे करावेत ? कोणतं इंद्रिय आमच्या ताब्यात आहे ? म्हणून सतत त्याची प्रार्थना करायची. ऋषीकेश म्हणतात ईश्वराला. तो सर्व संकट दूर करणारा आहे. चूक झाली म्हणून प्रयत्न सोडायचा नाही. निराश व्हायच नाही. क्षमा मागायची आणि परत प्रयत्न करायचा. कधीतरी होईल. या जन्मात नाही तर पुढच्या जन्मात होईल नाहीतर त्याच्या पुढचा जन्म.

परंतु सारखी तळमळ लागली पाहीजे. तुझी दया केव्हा होईल हे सारख वाटलं पाहीजे मनाला. ब्रम्हदेवांनी भागवंतांची स्तुती केली त्यात तीन साधन सांगितली आहेत.

१] तुझी अनुकंपा केव्हा होईल याची सतत वाट पहातो आहे.

२] जी सुखदुःख असतील ती भोगायची आहेत आणि

३] सदैव नम्रपणाने रहायचे आहे.

या तीन साधनांनी ईश्वराची कृपा होते.

xxxx श्रीराम जयराम जयजय राम xxxx